# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सामनगांव रोड नाशिक-रोड ,नाशिक

☎ : 2461479, Fax : 2455301 ई-मेल:-ronashik.dte.@gmail.com

www.dtensk.org

जा.क्र. तंशि/विकाना/तांशा/२०११/ 719 दिनांक 10 MAY 2011

**स्मरणपत्र - १**

प्रति,
प्राचार्य,
सर्व विनाअनुदानित अभियांत्रिकी,
पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था,
नाशिक विभाग

**विषय :- विनाअनुदानित तंत्रनिकेतनातील कर्मचा-यांच्या विविध समस्यांबाबत**

**संदर्भ** :- १.संचालनालयाचे पत्र क्र.१०/एनजीपी/२०१०/तक्रार/१५९० दिनांक २२.११.२०१०
व त्यासोबतचे महाराष्ट्र शासनाचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्र. संकीर्ण
२०१०/(१५९/१०)/तांशि २, दिनांक २२.११.२०१०
२. या कार्यालयाचे पत्र क्र. तंशि/विकाना/तांशा/२०१०/९३१ दिनाक २७.१.२०११

उपरोक्त विषयांस अनुसरुन संदर्भिय क्र.१ च्या पत्राची सहपत्रांसह प्रत सोबत जोडत आहे. सदर पत्राचे सहपत्रासह अवलोकन करावे. टॅफनॅपच्या पत्रान्वये संधटनेने विनाअनुदानित अभियांत्रिकी पदविका संस्थामधील कर्मचा-यांच्या विविध समस्यांबाबत चर्चा करण्याबाबत मा.मंत्री महोदयांची वेळ मागितलेली आहे. टॅफनॅप संधटनेने त्यांच्या पत्रामध्ये खालील मागण्या नमूद केलेल्या आहेत. त्याअनुषंगाने आपल्या संस्थेची माहिती संचालनालयाने संदर्भिय पत्र क्र. १ नुसार खालील मागणी केलेल्या मुद्याची माहिती तात्काळ संचालनालयास सादर करणेबाबत या विभागीय कार्यालयास कळविले आहे.

१. आपल्या संस्थेतील प्राध्यापकांना सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीची अंमलबजावणी व फरकाची रक्कम मिळाली आहे किंवा नाही.
२. आपल्या संस्थेतील कार्यरत असणा-या कर्मचा-यांच्या वेतनासाठी स्वतंत्र वेतनखाते काढणे अनिवार्य आहे, त्याबाबत आपण कोणती कार्यवाही केली आहे किंवा नाही.
३. आपल्या संस्थेतील कार्यरत असणा-या कर्मचा-याकरीता ग्रॅच्युएटीची तरतूद करणे संस्था चालकांना अनिवार्य आहे. त्याबाबत आपण कोणती कार्यवाही केली आहे किंवा नाही.

उपरोक्त नमुद मुद्याची माहिती सादर करण्याबाबत संदर्भिय क्र.२ च्या पत्रानुसार कळविले होते परंतु ३ महिन्याचा कालावधी होउनही अदयापपर्यत आपल्या संस्थेची माहिती प्राप्त झालेली नाही ही बाब योग्य नाही. तरी आपणास पुश्नच कळविण्यात येते की, सदरील माहिती ही माहितीच्या अधिकारांतर्गत आवश्यक असल्याने आपल्या संस्थेबाबतची वर नमूद केलेल्या मुद्यांची माहिती <u>तात्काळ दिनांक १२ मे २०११ पर्यत दोन प्रतीत</u> या कार्यालयास सादर करावी.आपल्या संस्थेची माहीती प्राप्त न झाल्यास व याबाबत भविष्यात काही अडचणी उद्‌भवल्यास आपण स्वत: जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी

(दि.रा.नंदनवार)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक

प्रत - प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी
२/- त्यांनी सदरचे पत्र या विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

D:\TANSHA\Diploma 1-9-2009\Letter.Instt.doc.doc